


श्री व्यंकटेश बहुउद्देशिय संस्था, गडचांदूर
द्वारा संचालित

विदर्भ कॉलेज ऑफ आर्ट्स,
कॉमर्स अॅन्ड सायन्स, जिवती (महाराष्ट्र)
(कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय)

Shri Vyankatesh Bahuddeshay Sanstha, Gadchandur undertaking

# VIDARBHA COLLEGE OF ARTS, COMM. & SCI, JIWATI

(Affiliated to Gondwana University, Gadchiroli)

**Ta. : Jiwati, Dist. Chandrapur - 442 908**
**Mob. : 7218184216**

# PROSPECTUS

श्री व्यंकटेश बहुउद्देशिय संस्था, गडचांदूर
द्वारा संचालित

# विदर्भ कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अॅन्ड सायन्स, जिवती

(कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय)

संलग्नता
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संस्थापक अध्यक्ष
**मा.श्री नामदेवरावजी देशमुख**

## माहिती पुस्तिका

सत्र २०    – २०

त. जिवती, जिल्हा : चंद्रपूर – 442 908
मो. : 7218184216
**E-mail : vmvjco@rediffmail.com**

श्री व्यंकटेश बहुउद्देशिय संस्था, गडचांदूर द्वारा संचालित

नोंदणी क्र. – २२३/२०००(चं) एफ ६९२८ (चं.)

# विदर्भ कॉलेज ऑफ आर्ट्‌र्स, कॉमर्स ॲन्ड सायन्स, जिवती

## व्यवस्थापक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| * | मान. श्री. बाळासाहेब माणिकराव देशमुख | – | उपाध्यक्ष |
| * | मान. श्री. शेख रऊफ शेख चमन | – | सचिव |
| * | मान. श्री. दिपक महाराज हरी महाराज पुरी | – | कोषाध्यक्ष |
| * | मान. श्री. मोहन बाबाबुआ भारती | – | सहसचिव |
| * | मान. श्री. बाबु जनार्धन देशमुख | – | उपकोषाध्यक्ष |
| * | मान. श्री. नानासाहेब देशमुख | – | सदस्य |
| * | मान. श्री. विश्वनाथ नामदेवराव देशमुख | – | सदस्य |
| * | मान. श्री. विठ्ठल महाराज पुरी | – | सदस्य |

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| * | श्री. बाळासाहेब माणिकराव देशमुख | – | अध्यक्ष |
| * | डॉ. शारदा एच. शाक्य | – | सचिव |
| * | श्री. शेख रऊफ शेख चमन | – | सदस्य |
| * | श्री. विश्वनाथ ना. देशमुख | – | प्रतिष्ठित नागरिक |
| * | श्री. रंगनाथ ना. देशमुख | – | प्रतिष्ठित नागरिक |
| * | श्री. बबरु माधवराव चव्हाण | – | पालक प्रतिनिधी |
| * | प्रा. गंगाधर वैजनाथ लांडगे | – | प्रा. प्रतिनिधी |
| * | प्रा. संजयकुमार ब. देशमुख | – | प्रा. प्रतिनिधी |
| * | प्रा. चतुरदास जे. तेलंग | – | प्रा. प्रतिनिधी |
| * | श्री. लक्ष्मण सुर्यभान शिंदे | – | शिक्षकेत्तर कर्मचारी |
| * | श्री. व्यंकटी अंतुराम वाकडे | – | शिक्षकेत्तर कर्मचारी |

## शाळा समिती

| | | | |
|---|---|---|---|
| * | श्री. शेख रऊफ शेख चमन (संस्था सचिव) | – | अध्यक्ष |
| * | डॉ. शारदा शाक्य (प्राचार्या) | – | सचिव |
| * | श्री. नानासाहेब देशमुख (संस्था पदाधिकारी) | – | सदस्य |
| * | श्री. विश्वनाथ नामदेवराव देशमुख (संस्था पदाधिकारी) | – | सदस्य |
| * | श्री. गुणवंत मस्कले (प्रा. प्रतिनिधी) | – | सदस्य |
| * | श्री. जयंता वासाडे (प्रा. प्रतिनिधी) | – | सदस्य |
| * | श्री. संजय मुंडे (प्रा. प्रतिनिधी) | – | सदस्य |
| * | श्री. कांबळे साहेब (शिक्षण विस्तार अधिकारी) | – | सदस्य |
| * | श्री. गिरीश कांबळे (क. प्रतिनिधी) | – | सदस्य |

## माहिती पत्रक

# गोंडवाना विद्यापीठ गीत

(University Song)

गोंडवाना नव तपोवन आदिजन वन परिसरी
विश्वविद्यापीठ हे ज्ञानार्चना या मंदिरी ।।धृ.।।

स्त्रोत आदिम संस्कृतीचा या प्रदेशी निर्मळ
शास्त्र, विद्या अन् कलेतुर अमृताचे ओहळ
त्या झऱ्यांना करुनि विकसित मिळवू विद्यासागरी ।।१।।

शास्त्र वाङ्मय, तंत्रविद्या व्यावसायिक ज्ञानही
अर्थ वा वाणिज्य क्रीडा अन् कला विज्ञानही
नित इथे बहरेल प्रतिभा नवयुवांच्या अंतरी ।।२।।

ज्ञानगंगा पुण्यपावन जीव तिजसंगे शिव
उचित संस्कारिच जगती श्रेष्ठ ठरतो मानव
उंच, उन्नत झेप घेतिल छात्र इथले अंबरी ।।३।।

दलित, पिडीत, दीन, शोषित सर्व जाती बांधव
ज्ञानपीठी या निमंत्रित शिक्षणात्सुक मानव
प्राप्त विद्येनेच मनुजा अभ्युदय या भूवरी ।।४।।

बन्धुता, स्वातंत्र्य, समता, न्यायनीतीला जपावे
विश्वशांतीस्तव नवे आव्हान हे पेलून घ्यावे
ज्ञान, अस्त्रांनीच निश्चित विजय जीवन संगरी ।।५।।

# विदर्भ कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड सायन्स, जिवती

विद्यार्थी मित्रांनो,

निरनिराळ्या परिक्षेतील आपल्या यशाबद्दल अभिनंदन! आणि या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनपुर्वक स्वागत.

आमच्या महाविद्यालयात शिक्षण घेणारा विद्यार्थी एक सर्वांगिण, परिपूर्ण, व्यक्तीत्त्व विकसित केलेला उद्याचा जबाबदार नागरिक व्हावा, कर्तव्यदक्ष, संवेदनशील, सेवाभावी, निर्व्यसनी, होतकरु, सुजाण, सामाजिक व राष्ट्रीय मूल्यांची जाण असणारा समाजव्यवस्थेचा तो जबाबदार घटक बनावा. त्याने त्याचे स्वतःचे, परिवाराचे हित साधण्याचे पूर्ण कौशल्य व विश्वास त्यांचे व्यक्तीत्वात अनुस्यूत व्हावा व आपण घेतलेल्या महाविद्यालयातील उच्च शिक्षणाचा त्याच्या भावी जीवनात त्याला यथायोग्य उपयोग व्हावा या प्रामाणिक भावनेने आमचे महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण जडणघडणीसाठी अध्यापन प्रक्रियेसोबतच इतर महत्त्वपूर्ण अनुषंगिक उपक्रमाचा सातत्यशील प्रयत्न करते. आमच्या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे परिपूर्ण व्यक्तीमत्त्व विकासाचे मुख्य व मूलभूत उद्दिष्ट हेच आम्ही आमचे लक्ष व सूत्र निश्चित केले आहे.

मित्रहो मोठ्या आशा–आकांक्षा घेऊन आपण महाविद्यालयात प्रवेश घेता आपण मोठे झालो पाहिजे. विद्याविभुषित झालो पाहीजे ही आपली जाज्वल्य अभिलाषा! आपल्या अभिलाषेतुनच समाज आणि देश घडत असतो. विज्ञान युगात आपणांवर जास्त जबाबदारी आलेली आहे. मतदाराच्या नात्यांनी आपण प्रत्यक्ष प्रवाहात आलात म्हणूनच आपण अधिक जागरुक आणि परिश्रमी होणे आवश्यक आहे. कारण परिश्रम आणि त्याग हे नवनिर्मितीचे घटक होत. ही वास्तु आदिवासी भागात उभारण्यामागे मा.मा. विलासराव देशमुख व मा. नामदेवरावजी देशमुख यांचे जिद्द, परीश्रम व त्याग ह्यांची निस्सीम भक्ती आहे. मानसाच्या प्रयत्नात अडसरांना लोटा नसतो पण कर्तुत्वान मानसे अडचणीवर मात करुन आपला मार्ग स्वतः काढत असतात. त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन व्यंकटेश बहुउद्देशिय संस्थेचे कला व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची सुरुवात केली.

ग्रंथालय आणि शिक्षण यांचा अन्योन्य असा संबंध आहे. विद्यार्थ्यांना अद्ययावत माहीती मिळविता यावी याकरीता विविध विषयावरील अनेक पुस्तकांचा भर टाकण्याचा मानस आहे. शिक्षणासोबतच धैर्य व साहस या गुणांचा विकास व्हावा म्हणून शारीरिक शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

आजच्या शिक्षणाचा केंद्रबिंदु विद्यार्थी आहे. त्याचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. यात शिक्षकांचा मोलाचा वाटा असतो. यादृष्टीने महाविद्यालयात पात्रता प्राप्त व अनुभवी प्राध्यापकवृंद असुन शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी सतत झटत असतात, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

मंडळाने महाविद्यालयाच्या सुधारणा व विकासासाठी दुरदृष्टीकोनातुन भव्य इमारत उभारली असून वेगवेगळ्या महत्त्वाकांक्षी योजना आखलेल्या आहेत व त्या पुर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे.

**आदेशान्वये**

**प्राचार्य**

विदर्भ कॉलेज ऑफ आर्टस,
कॉमर्स अॅण्ड सायन्स, जिवती

## Vision:

Our vision is to educate the student of tribal, hilly region and bring them into mainstream society.

## Mission:

Our mission is to reach out to the student of hilly tribal region and uplift them by giving new direction, heights and ambition through education.

## Objectives:

- To impart Quality and value based education to the student.
- To create health awareness through education.
- To empower girl student through education to become morally, socially and economically independent.
- To promote national integrity equality and social justice among the student.
- To conserve custom and tradition of this tribal community.
- To bring the tribal community into the main stream of society.
- To empower tribal community in agriculture field through education.

# विदर्भ कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, जिवती

## महाविद्यालयाचे वैशिष्ट्ये

१) महाविद्यालयाची प्रशस्त इमारत.

२) उच्च विद्याविभूषित अनुभवी प्राध्यापक वर्ग

३) समृद्ध ग्रंथालय

४) खेळाचे भव्य मैदान

५) विविध क्रीडा साहित्याची उपलब्धता

६) राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन

७) विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचन कक्ष

८) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न

९) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तित्त्व विकासासाठी विविधांगी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन

१०) विविध प्रकारचे ऐच्छिक विषय निवड करण्याकरीता भरपूर संधी

११) गृहअर्थशास्त्र विषयाची आधुनिक प्रयोगशाळा

१२) स्वयंशिस्त सद्वर्तन आणि नैतिक संस्कारांना विशेष प्राधान्य

१३) निसर्गरम्य आल्हाददायक वातावरण

१४) अल्पसंख्यांकांसाठी शिष्यवृत्ती योजना

१५) संपूर्ण सत्रामध्ये नियमित चाचणी आणि वार्षिक परीक्षेची तयारी

१६) नियमित वर्ग, शिक्षण, गुणवत्ता, पारितोषिके, अतिरिक्त मार्गदर्शन आणि मूल्यमापनाची सोय, इंटरनेटची सेवा उपलब्ध, सांस्कृतिक विभाग मध्ये सहभागी होण्याची संधी

१७) विद्यार्थ्याला आरोग्य विषयक समुपदेशन व विविध प्रकारच्या चाचणी (ब्लड, सिकलसेल, शारीरिक, वैद्यकिय) व विस्तार सेवा योजना.

# माहिती पत्रक

## प्रवेश पद्धती

प्रवेश अर्ज विद्यार्थी व विद्यार्थिनींनी स्वतःच्या हस्ताक्षरात भरुन व पालकांची स्वाक्षरी घेऊन सादर करावा.

### अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्रे

१) शेवटच्या उत्तीर्ण परिक्षेची गुणपत्रिका (वर्ग १० व वर्ग १२ वा)

२) शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला (मुळ प्रत)

३) गुणपत्रिकेच्या मुळ प्रतिसोबत दोन सत्यप्रत (झेरॉक्स)

४) वर्तणूकीबद्दलचे प्रमाणपत्र

५) जातीचे प्रमाणपत्र (एस.सी./एस.टी./व्ही.जे.एन.टी./ओ.बी.सी./एस.बी.सी.)

६) शैक्षणिक सत्रात खंड पडला असल्यास तहसिलदार यांचे शैक्षणिक खंड प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच शिष्यवृत्तीत खंड पडला असल्यास खंड प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

७) गडचिरोली, नागपूर विद्यापीठ/बोर्ड व्यतिरिक्त परिक्षा उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना स्थलांतर प्रमाणपत्र व पात्रता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

८) उत्पन्नाचा दाखला तहसिलदारकडून घेणे आवश्यक आहे. (फक्त शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी)

९) प्रवेश अर्जासोबत स्वतःचा पत्ता लिहीलेले दोन लिफापे व पासपोर्ट साईज दोन फोटो जोडणे अनिवार्य आहे.

१०) एकदा घेतलेला विषय कोणत्याही सबबीवर बदलले जाणार नाही.

११) प्रवेशीत विद्यार्थ्यांना शासन निर्णय-क. संकीर्ण-११०३/(१७३/०३) विशी-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२, दिनांक ११ मार्च २०१५ नुसार विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाचा आपल्या नावासमोर व वडीलांच्या नावा अगोदर उल्लेख करणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रवेश अर्जासोबत रेशन कार्डची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

१२) मुळ प्रमाणपत्र महाविद्यालयात सादर करण्यापूर्वी आवश्यक तेवढ्या सत्य प्रतीलीपी विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ काढून ठेवाव्यात. प्रवेशानंतर मुळ प्रमाणपत्र कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

१३) महाविद्यालयात प्रथमच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत विद्यापीठ नामांकन अर्ज योग्य शुल्कासह भरणे अनिवार्य आहे.

१४) प्रवेश अर्जासोबत संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

१५) आरक्षणासंबंधी महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे प्रवेश देण्यात येईल.

१६) रेव्हेन्यू स्टॅम्प आकाराचे दोन कलर फोटो फार्म सोबत जोडावे.

१७) शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी प्रवेश झाल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा – पाटण येथे बँक खाते उघडून त्यांचा खाते क्रमांक लिपीकाकडे देणे बंधनकारक आहे.

टिप :– आधार कार्ड किंवा मतदान ओळखपत्राची झेरॉक्स आवश्यक.

# कनिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासक्रम

## कला शाखा
(Arts Stream)
(मराठी माध्यम)
**११ वी आणि १२ वी**

**अनिवार्य विषय** (Compulsory Subjects) :-

१) इंग्रजी English　　२) मराठी (Marathi)

---

**ऐच्छिक विषय** (Optional Subjects) :-
खालीलपैकी कोणतेही तीन विषय निवडावे.

१) राज्यशास्त्र (Political Science)　　२) इतिहास (History)
३) अर्थशास्त्र (Economics)　　४) समाजशास्त्र (Sociology)
५) पर्यावरण शिक्षण (E.Study)

## विज्ञान शाखा
(Science Stream)
(English Medium)
**११ वी आणि १२ वी**

**अनिवार्य विषय** (Compulsory Subjects) :-

१) इंग्रजी English　　२) मराठी (Marathi)

---

**ऐच्छिक विषय** (Optional Subjects) :-
खालीलपैकी कोणतेही तीन विषय निवडावे.

1) Chemistry　　2) Physics　　3) Biology
4) Mathematics / Sociology　　5) Environmental Studies

# वरिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासक्रम

## कला शाखा

(Arts Stream)

(मराठी माध्यम)

**बी.ए. भाग-१, * बी.ए. भाग-२, * बी.ए. भाग-३**

**अनिवार्य विषय** (Compulsory Subjects) :-

१) इंग्रजी English २) मराठी (Marathi) ३) पर्यावरण शिक्षण (E. Study)

---

**ऐच्छिक विषय** (Optional Subjects) :-

खालीलपैकी कोणतेही तीन विषय निवडावे.

१) राज्यशास्त्र (Political Science) २) इतिहास (History)

३) मराठी वाङ्मय (Marathi Literature) (M.L.T.) ४) समाजशास्त्र (Sociology)

## विज्ञान शाखा

(Science Stream)

(English Medium)

B.Sc.-I, B.Sc.-II, B.Sc.-III

**अनिवार्य विषय** (Compulsory Subjects) :-

१) इंग्रजी English २) मराठी (Marathi)

---

**ऐच्छिक विषय** (Optional Subjects) :-

खालीलपैकी कोणतेही तीन विषय निवडावे.

1) Chemistry 2) Botany 3) Zoology

5) Environmental Studies

# माहिती पत्रक

## वरिष्ठ महाविद्यालयातील शुल्क

प्रवेशित सत्र २० - मधील प्रवेश शुल्क खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | विवरण | बि.ए. भाग १,२,३ |
|---|---|---|
| १ | वार्षिक शुल्क | १२५ |
| २ | विद्यार्थी कल्याण निधी | ०५ |
| ३ | विद्यार्थी वैद्यकिय मदत निधी | ०५ |
| ४ | विद्यार्थी सहाय्यता निधी | ०५ |
| ५ | विद्यार्थी क्रीडा शुल्क | २५ |
| ६ | विद्यार्थी संघ शुल्क | ०५ |
| ७ | वैद्यकिय तपासणी फॉर्म शुल्क | ०५ |
| ८ | नामांकन शुल्क (फक्त प्रथम वर्षा करिता) | १०० |
| ९ | अश्वमेद्य शुल्क | ३० |
| १० | ई-सुविधा शुल्क | ५० |
| ११ | डिझास्टर मॅनेजमेंट (आपत्ती व्यवस्थापन शुल्क) | १० |
| १२ | पर्यावरण शुल्क (द्वितीय वर्षाकरिता | २०० |
| १३ | लायब्ररी शुल्क | २४० |
| १४ | क्रीडा आणि व्यायाम शाळा शुल्क (जिमखाना) | १२० |
| १५ | एक्स्ट्रा करि.एक्टी. (वि.वि. उपक्रम शुल्क) | ८० |
| १६ | वैद्यकिय तपासणी शुल्क | ४० |
| १७ | शारीरिक क्षमता चाचणी | ४० |
| १८ | विद्यार्थी सहायता निधी | ६० |
| १९ | महा. वार्षिकांक शुल्क | १०० |
| २० | महा. परिक्षा शुल्क | ५० |
| २१ | ग्रंथालय तिकीट | ०५ |
| २२ | ओळखपत्र | २५ |
| २३ | निवडणुक शुल्क | ०५ |
| २४ | वाचनकक्ष शुल्क | ०५ |
| २५ | प्रवेश शुल्क (नोंदणी शुल्क) | १५ |
| २६ | शिक्षण शुल्क | ८०० |
| २७ | नामांकन फॉर्म | १० |

# माहिती पत्रक

## फी सवलत

(Fee Concession)

आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना (ज्यांच्या वडिलांचे / पालकांचे उत्पन्न १,००,०००/- पेक्षा कमी असेल आणि जे मागास जाती/जमातीचे नाहीत) इ.बी.सी. फॉर्मस् व वडिलांचा/पालकांचा मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला दोन प्रतीमध्ये (प्रवेश घेतल्याच्या तारखेपासून) १५ दिवसांचे आत कार्यालयात द्यावा. जर हा अर्ज विद्यार्थ्यांनी वरील मुदतीच्या आत कार्यालयात न दिल्यास किंवा त्यातील त्रुटीमुळे वा इतर कागदपत्रांच्या (प्रमाणपत्रांच्या) अभावी अधिकाऱ्यांनी नामंजूर केल्यास विद्यार्थ्याला पूर्ण फी भरावी लागेल. विद्यार्थ्याचे अर्ज कार्यालयात देतांना अर्ज दिल्याची पावती घ्यावी.

१) मागास जाती (एस.सी.), जमाती (एस.टी.), विमुक्त भटक्या जाती/जमाती (व्ही.जे./एन.टी.)च्या विद्यार्थ्यांनी फी सवलत मिळण्याकरीता निर्धारित नमुन्यात केलेला अर्ज व प्रमाणपत्र प्रवेश घेतल्याच्या तारखेपासून सात दिवसांत कार्यालयात द्यावा व अर्ज दिल्याची तशी पावती कार्यालयाकडून घ्यावी. वरीलप्रमाणे अर्ज देण्यास विद्यार्थी चुकला तर पूर्ण ट्युशन फी भरावी लागेल.

२) प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या पाल्यांनी त्यांचे फी माफीचे अर्ज प्रवेश घेतल्यापासून सात दिवसांचे आत कार्यालयात द्यावे.

३) माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या पाल्यांनी त्यांचे फी माफीचे अर्ज प्रवेश घेतल्यापासून सात दिवसांचे आत कार्यालयात द्यावे. त्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता एस.एस.सी., डी.एड. असावी व ते ५ ते ७ व्या इयत्तेपर्यंत शिकविणारे असावे. ते ज्या ठिकाणी नोकरी करतात तेथील मुख्याध्यापकांचे तशा प्रकारचे प्रमाणपत्र आणावे.

ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनीचे आई/वडील सैन्यात नोकरी करीत आहेत किंवा सेवानिवृत्त झाले आहेत (फक्त वर्ग २, ३ व ४) त्यांनी विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडल्यास त्यांना फी माफीची सवलत मिळेल.

टिप :- शासकीय सवलतीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना जे शुल्क सवलतीत येत नाही ते शुल्क प्रवेश घेतेवेळी भरावे लागेल.

# माहिती पत्रक

## शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची पद्धती

(Procedure to Avail Scholarship)

मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी करावयाचे अर्ज जून/जुलै महिन्यात करावेत. हे विहीत नमुन्यातील ऑनलाईन अर्ज भरावेत. मिळतील. विद्यार्थ्यांना हे अर्ज अचुक आणि परिपूर्ण भरुन (हार्ड कॉपी) आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात सादर करावे व संबंधीत लिपीकाकडून फॉर्म सादर केल्याची पावती घ्यावी.

अर्जातील माहितीत त्रुटी व माहिती चुकीची असल्यास त्याला विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील.

१) विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडत असल्यास अशा विद्यार्थ्यांना या खंड कालात तो काय करीत होता? या सबंधाचे सक्षम न्यायालयाचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

२) ज्या विद्यार्थ्यांना पुर्वीच्या वर्षात (मागील सत्रात) भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळत होती आणि जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेत अशांना परत शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. महाविद्यालयातर्फे हे अर्ज नुतनीकरणासाठी समाजकल्याण अधिकारी व प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे पाठविण्यात येईल.

३) इतर अधिक माहितीसाठी कार्यालयात चौकशी करावी किंवा या संबंधीचा शासनाचा अध्यादेश पहावा. शिष्यवृत्ती फॉर्म भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी बँकेत बचत खाते उघडणे आवश्यक आहे.

४) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरुन त्याची एक प्रत महाविद्यालयास सादर करावी तसेच राष्ट्रीय बँकेतील त्यांचे नावे असलेल्या बचत खात्याचा क्रमांक (पासबुकची झेरॉक्स) महाविद्यालयातील लिपीकाकडे द्यावी.

**विद्यार्थ्याच्या जातीत बदल झाल्यास**

विद्यार्थ्याच्या जातीत बदल असल्यास व तसा हक्क त्यास सांगावयाचा झाल्यास त्यांनी या दुरुस्तीचे प्रमाणपत्र संचालक, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून आणावे इतर कोणाचेही प्रमाणपत्र ग्राह्य मानले जाणार नाही.

# माहिती पत्रक

## प्रवेश रद्द करण्याकरीता महत्त्वाची कारणे

१) महाविद्यालयाच्या नियमानुसार आणि प्राचार्यांच्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांची वर्तणूक समाधानकारक नसणे.

२) महाविद्यालयाने निश्चित केलेले शुल्क दिलेल्या मुदतीच्या आत न भरणे.

३) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील प्रमाणित केलेली शैक्षणिक प्रगती नसणे.

४) महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या शिस्तीचा भंग करणे.

५) शिक्षण घेत असलेल्या वर्गामध्ये ७५% पेक्षा कमी उपस्थिती असणे.

६) महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी चुकीची माहिती आणि बनावट प्रमाणपत्र सादर करणे.

७) महाविद्यालयाच्या संपत्तीची नासधूस करणे.

८) महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर यांचेशी गैरवर्तणूक करणे व महाविद्यालयीन कामकाजामध्ये अडथळे निर्माण करणे.

९) महाविद्यालयात अभ्यासाची तासीका सुरु असतांना बिनकामाने व्हरांड्यात फिरणे.

१०) महाविद्यालयामध्ये नियमित येतांना स्वतःचे ओळखपत्र घेवून न येणे.

११) महाविद्यालयाच्या भिंतीवर पान, गुटखा, तंबाखू खाऊन थुंकणे.

१२) महाविद्यालयात बाहेरील विद्यार्थी सोबत आणणे, विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याकरीत महाविद्यालयाने नेमून दिलेल्या प्रवेश समितीसमोर उपस्थित राहावे. तद्नंतर ही विद्यार्थ्याचा अंतीम निवडीचा अधिकार प्राचार्यांना राहील ते विद्यार्थ्यांना समक्ष भेटीकरीता बोलावू शकतात. यासाठी विद्यार्थ्यांना येण्या व जाण्याचा प्रवासखर्च स्वतः करावा लागेल. प्राचार्यांनी बोलवले असता आपला प्रवेश झाला असे गृहित धरु नये. विद्यापीठाद्वारा मंजूर होईपर्यंत तात्पुरता समजला जाईल.

१३) महाविद्यालयात राजकारणाशी संबंधीत मोर्चा तसेच मिरवणूक काढणे.

१४) महाविद्यालायने निर्धारित केलेल्या अन्य नियमांचे उल्लंखन करणे.

# माहिती पत्रक

## राष्ट्रीय सेवा योजना

हा दोन वर्षाचा कार्यक्रम असून पदविचा अभ्यासक्रम करीत असताना तीन वर्षपैकी कोणत्याही दोन वर्षाला एन.एस.एस. मध्ये विद्यार्थ्यांना भाग घेता येईल. महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागा तर्फे समाजसेवेत आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड या विभागाद्वारे केली जाते. समाजातील अंधश्रद्धा, जातीवाद, आरोग्य, पर्यावरण संवर्धन व पाणी समस्या, व्यसन मुक्ती इ. विषयावर समाजकार्य या विभागाद्वारे केले जाते. दरवर्षी ७ दिवसाचे विशेष श्रम–संस्कार शिबिर महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाद्वारे ग्राम पातळीवर घेतले जाते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या योग्यतेनुसार राज्य स्तरीय, राष्ट्रीयस्तरीय व विद्यापीठ स्तरीय रा.से.यो. शिबिरात भाग घेण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिली जाते तसेच या उपक्रमामध्ये सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कार्याची दखल विद्यापीठाद्वारे घेण्यात येते व विद्यार्थ्यांना १० अतिरिक्त गुण दिले जाते.

ज्या विद्यार्थ्यांना रा.से.यो. या उपक्रमात सहभाग घेण्याची आवड असेल त्यांनी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत डी. पानघाटे यांचेशी प्रवेशानंतर १५ दिवसाच्या आत संपर्क साधावा.

# माहिती पत्रक

## विशेष सुचना

१) बी.ए. द्वितीय आणि बी.एससी. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शास्त्र हा विषय आवश्यक केला असून त्या विषयाची परिक्षा व वार्षिक प्रकल्प अहवाल सादर करणे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, विद्यापीठाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना बंधनकारक केले आहे. पर्यावरण शास्त्राचे परिक्षा न देणाऱ्या व प्रकल्प अहवाल सादर न करणाऱ्या विद्यार्थ्यांचा बी.ए. द्वितीय व बि.एससी. द्वितीय वर्षाचा निकाल जाहीर केला जाणार नाही.

२) बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या निर्देशाप्रमाणे नामांकन विविध शुल्क व परिक्षेबाबतचे नियम लागू होतील.

३) दिलेल्या तारखेत संबंधीत प्राध्यापकाकडे Assignment सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा Assignment चे गुण विद्यापीठाकडे पाठविण्यात येणार नाही याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

# प्रतिज्ञापत्र (१)

मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो/देते की, श्री/कु. ..................................................................................
वर्ग ................................ सत्र .......................... मध्ये आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला असून माहितीपत्रकातील संपूर्ण माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे ती मला समजलीही आहे. महाविद्यालयातील संपूर्ण शैक्षणिक प्रक्रियेशी निगडीत शिस्तीचे मा काटेकोरपणे पालन करीन. महाविद्यालयाशी माझी सजग आत्मीय बांधिलकी समजून मी महाविद्यालयाची स्वच्छता, शांतता, सौंदर्य या गोष्टींना प्रामाणिकपणे जपेन. वर्ग खोली, भिंती, प्रांगण यांना घाणेरडे किंवा बाधित करण्याचा अनुचित प्रयत्न मी करणार नाही. महाविद्यालयाच्या सौंदर्यात व शैक्षणिक वातावरणास आल्हाददायी करणाऱ्या, त्यास नयन मनोहर, प्रसन्न बनविणाऱ्या महाविद्यालयातील फुलझाड, लता वेलीस, वृक्षांना मी इजा पोहचविणार नाही. पान, खर्रा, तंबाकू, चॉकलेट अशा वस्तूंचा अध्यापन काळात / महाविद्यालयीन वेळात मी वापर करणार नाही.

मी नियमित व मन लावून माझे तास करेन, स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकासात भर टाकणाऱ्या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या अनुषंगिक उपक्रमास मी हिरीरीने व मन लावून भाग घेईल. प्रामाणिकपणे, कठोर परिश्रम घेऊन मी अभ्यास करने. परीक्षेत कॉपी, कुणाचे चोरुन बघणे अशा अनुचित प्रकाराचा आधार घेऊन मी परीक्षेचे पावित्र्य विटंबित करणार नाही तसेच माझ्या पालकांचा, संस्थेचा, प्राचार्यांचा, प्राध्यापक वृंदांचा सन्मानही कमी करणार नाही. याची मनोमन मी दक्षता घेईल. महाविद्यालयात मी नियमित उपस्थित राहील. माझ्या सर्वांगीण गुणवत्तापूर्ण व्यक्तीमत्त्वाच्या विकासाकरीता मला महाविद्यालयात शिकण्याची जी संधी मिळाली त्या संधीचा मी माझे जीवन सुंदर करण्यास्तव प्रामाणिक प्रयत्न करेन. प्रस्तुत प्रतिज्ञापत्रात अशी मी हमी देते/देतो.

प्रतिज्ञापत्रातील नियमांचे माझेकडून उल्लंघन झाल्यास प्राचार्यांनी माझेवर केलेली कार्यवाही मला स्विकार्ह राहील.

स्वाक्षरी　　　　　　　　　　स्वाक्षरी

(पालकांची)　　　　　　　　　　(विद्यार्थ्याची/विद्यार्थिनीची)

दिनांक :

ठिकाणः

# प्रतिज्ञापत्र (२)

मी ..............................................................................................................................

वर्ग ................................ वर्ष .......................... मध्ये आपल्या महाविद्यालयात प्रवेशित आहे. महाविद्यालयाच्या माहितीपत्रकात नमूद केलेल्या संपूर्ण सूचनांचे मी काळजीपूर्वक सुक्ष्म वाचन केले व ते समजूनही घेतले आहे. महाविद्यालयातील अध्यापन कालावधीत तसेच महाविद्यालयाचे बाहेरील वेळेतही मी महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी–विद्यार्थिनींचा माझेकडून कसलाही वा कुठलाही छळ होणार नाही त्यास माझेकडून त्याची शारीरिक, भावनिक, मानसिक प्रताडना होणार नाही याची मी दक्षता घेईन. रॅगिंग विरोधी नियमांचे मी कटाक्षाने व काळजीने अनुपालन करील. माझेकडून प्रस्तुत नियमांचे अनुपालन न झाल्यास रॅगिंग विरोधी कायद्यानुसार तसेच महाराष्ट्र शासनाचे सन १९९९ चे अधिनियम क्र. ३३ नुसार मी शिक्षेस पात्र राहीन.

महाविद्यालयाने माझेवर केलेली कार्यवाही मला व माझ्या पालकांनाही मंजूर असेन.

प्रतिज्ञापत्रातील नियमांचे माझेकडून उल्लंघन झाल्यास प्राचार्यांनी माझेवर केलेली कार्यवाही मला बंधनकारक राहील..

| | |
|---|---|
| स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| (पालकांची) | (विद्यार्थ्याची/विद्यार्थिनीची) |

दिनांक :

ठिकाण:

# ✻ हमीपत्र ✻

## (पालक व विद्यार्थी (पाल्य) यांचेसाठी)

मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, माझा पाल्य श्री/कु. ........................................................ ........................................... वर्ग ................................ वर्ष ......................... प्रवेशित असून महाविद्यालयाने चालू शैक्षणिक सत्रात आयोजित केलेल्या, घेतलेल्या, घेत असलेल्या विविध महाविद्यालयीन, विद्यापीठ, विभागीय, राज्य, राष्ट्रीय स्तरावरील एन.एस.एस., मैदानी खेळ, कला, क्रीडा या उपक्रमानुषंगाने अपरिहार्य प्रवास तसेच निवास दरम्यान काही आकस्मिक इजा, दुखापत, आपत्ती ओढवल्यास त्यास आम्ही स्वतः जबाबदार राहू. त्याबाबत महाविद्यालयास आम्ही जबाबदार धरणार नाही. महाविद्यालयाने पाल्याचे व्यक्तित्त्व, विकासासाठी आयोजिलेल्या या उपक्रमात माझ्या पाल्याचा सहभाग असून उपक्रमातील शिस्तीचे व्यवस्थित अनुपालन करण्याची प्रस्तुत हमीपत्राद्वारे आम्ही पालक–पाल्य हमी देतो.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| (पालकांची) | (विद्यार्थ्याची/विद्यार्थिनीची) |

दिनांक :

ठिकाणः

# महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद

Teaching Staff

**प्राचार्या**

डॉ. शारदा एच. शाक्य,

बी.एससी., एल.एल.बी., एम.पी.एड., एम.फिल., पीएच.डी.

**मराठी विभाग –**

प्रा. जि. एस. राऊत, एम.ए., एम.फिल.

**समाजशास्त्र विभाग**

प्रा. जी.व्ही. लांडगे, एम.ए., एम.फिल., बी.एड.

**राज्यशास्त्र विभाग**

प्रा. सी.जे. तेलंग, एम.ए., एम.फिल.

**इंग्रजी विभाग**

प्रा. एस.बी. देशमुख, एम.ए., एम.फिल.

**इतिहास विभाग**

प्रा. एस.डी. पानघाटे, एम.ए. (इतिहास, मराठी), नेट, सेट (इतिहास), बी.एड.

**ग्रंथालय विभाग**

प्रा. एम. एस. साबळे, एम.लिब., नेट, सेट

---

**कनिष्ठ महाविद्यालयीन विभाग**

प्रा. जी.एस. मस्कले, एम.एससी. (रसायनशास्त्र), बी.एड.

प्रा. जे.बी. वासाडे, एम.ए. (राज्यशास्त्र, अर्थशास्त्र), बी.एड.

प्रा. एस. के. मुंडे, एम.ए. (मराठी, समाजशास्त्र), बी.एड.

प्रा. एल. डी. मंगाम, एम.ए. (इतिहास, राज्यशास्त्र), बी.एड., एम.एड.

प्रा. एस.के. सोमवंशी, एम.एससी. (जीवशास्त्र), बी.एड.

---

**शिक्षकेत्तर कर्मचारी**

श्री एल.एस. शिंदे – कनिष्ठ लिपीक

श्री व्ही.ए. वाकडे – कनिष्ठ लिपीक

श्री जी.डी. कांबळे – कनिष्ठ लिपीक

श्री डी.डी. बिरादार – ग्रंथपरिचर

श्री बी.बी. पिंपळकर – सेवक

श्री ए.आर. नळे – सेवक

श्री जी.एच. मेश्राम – सेवक